दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २४५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.२ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## ५ डिसेंबरला शाळा बंद आंदोलन व मोर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

शिक्षकांसमोर उभ्या टाकलेल्या संच मान्यता शासन निर्णय आणि टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) या संदर्भाने शिक्षकांच्या सेवेची शाश्वतीच उरलेली नाही. सेवेत असलेले शिक्षक हे अत्यंत भयग्रस्त झालेले आहे या अन्यायकारक कायद्याला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटना, माध्यमिक शिक्षक संघटना शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्या समन्वय समितीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर ५ डिसेंबर २०२५ रोजी शाळा बंद आंदोलन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढत असतानाच रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिवसेंदिवस शिक्षकांच्या विरोधामध्ये शासनामध्ये अन्याय करण्याची चढाओढ लागलेली आहे ती जर थांबवायची असेल तर सर्वांना एकजुटीने शासनाला आपली ताकद दाखवावीच लागेल.आपल्या राज्यस्तरीय नेत्यांनी घेतलेला निर्णय सार्थ ठरवण्याची जबाबदारी ही प्रत्येक संघटनांच्या पदाधिकारी,कार्यकर्ते व सभासद यांची आहे.

### पनवेल महानगरपालिका हवा प्रदूषण नियंत्रण मोहिमेत आक्रमक

# १६९ बांधकामांना नोटीस

### चारही प्रभागात धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी 'फॉग कॅनन' वाहनाच्या माध्यमातून पाणी फवारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाढत्या हवा प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार शहरातील सर्व प्रभागांमध्ये तपासणी, कारवाई आणि यंत्रणांची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू आहे. न्यायालयीन निर्देश व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने पालिकेने प्रदूषण नियंत्रणाचे उपक्रम अधिक गतीमान केले आहेत.



खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा व पन-वेल या प्रभागांमध्ये उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून बांधकाम व्यावसायिकांकडून धूळ नियंत्रणासंबंधी शासन नियमांचे पालन होते का याची खातरजमा करण्यात येत आहे. नुकतीच कामोठे आणि खारघर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध बांधकाम स्थळांची पाहणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान उप आयुक्त मा. स्वरूप खारगे यांनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या १५ मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे बांधकाम स्थळांवरील उपाययोजनांची प्रत्यक्ष तपासणी केली.

#### १६९ बांधकाम व्यवसायिकांना नोटीस

महापालिका प्रशासनाने प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालिका क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकांना एकूण १६९ नोटिसा बजावल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रभाग समिती - अ (खारघर) | १९ | प्रभाग समिती - क (कामोठे) | १९ |
| नावडे उपविभाग - | ३८ | प्रभाग समिती - ड (पनवेल) | ५८ |
| प्रभाग समिती - ब (कळंबोली) | ३५ | एकुण - | १६९ |

#### प्रभागनिहाय हवा प्रदूषण नियंत्रण समिती सक्रिय

प्रत्येक प्रभागात स्थापन करण्यात आलेल्या समित्या नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकामांवर थेट कारवाई करत असून त्यांचा अहवाल आयुक्तांना सादर केला जात आहे.

#### प्रदूषण नियंत्रणासाठी 'फॉग कॅनन' वाहनांद्वारे पाणी फवारणी

हवेतील धुळीचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी महापालिका आयुक्त चितळे यांच्या निर्देशानूसार खारघर, तळोजा, कामोठे- कळंबोली व पनवेल येथे चार फॉग कॅनन या वाहनांद्वारे दररोज ५० किमीपर्यंत तुषार फवारणी करून हवेतील धूळ नियंत्रण केले जात आहे. या या गाड्यावरती जीपीएस ट्रॅकींग सिस्टीमही बसविण्यात आली आहे.



#### हवा शुद्धीकरण यंत्रणेची उभारणी

सध्या कोपरागाव, खारघर, राणी लक्ष्मीबाई चौक, नावडे, लेबर नाका, कळंबोली, MGM हॉस्पिटल समोर, कामोठे प्रवेशद्वार अशा ५ ठिकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम कार्यरत आहेत. तर आणखी ५ ठकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

#### हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी आधुनिक मॉनिटरिंग सिस्टीम

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा एमआयडीसी भागात, कामोठे जव्हार इंडस्ट्रीयल व पनवेल इंडस्ट्रीयल भागात विविध कंपन्यामुळे परिसरामध्ये होणारे हवेच्या प्रदूषणाचे मोजमाप करण्यासाठी ,पनवेल शहरातील निवासी भागामधील हवेतील विविध घटकांची पातळी आणि हवामान घटकांचे निरीक्षण/ मोजमाप करून नागरिकांना अचूक माहिती देण्यासाठी मंकी पॉइंट, उत्सव चौक, IGPL नाका, कळंबोली प्रवेशद्वार, कामोठे पोलीस स्टेशन, संताजी महाराज जगनाडे चौक व वडाळे तलाव अशा ०७ ठिकाणी रिअल टाईम अम्बिएंट एअर क्वालिटी डस्ट मॉनिटर एड मेट्रॉलॉजिकल पॅरामिटर्स (Real Timeambient air Quality Dust Monitor Metrological Param-eters) स्थापित करण्यात आले आहेत.

### प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने महिलांना स्वयंरोजगारासाठी मोठा आधार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वसामान्य माणसाचा विचार करणारे : आ.प्रशांत ठाकूर

### पनवेल विधानसभा मतदार संघात ४२५० महिलांना घरघंटी व शिलाई मशीन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्य माणसाचा विचार करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आहेत त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी विविध योजना अंमलात आणल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व बहिणींनी कुटुंब आर्थिकदृष्ट्या सधन करण्यासाठी या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे कौशल्य विकसित करावे, स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये पुढाकार घ्यावा आणि आर्थिक प्रगतीसाठी सक्रिय भूमिका बजवावी, असे आव-ाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि. ०१) मार्केट यार्ड येथे केले.



पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार आणि प्रयत्नातून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला असून या योजनेअंतर्गत निवड झालेल्या ४ हजार २५० पात्र लाभार्थींना आजप-ासून शिलाई व घरघंटी मशीनचे वाटप योजनेचा शुभारंभ झाला. त्यावेळी आपल्या भाषणातून सर्व बहिणीशी संवाद साधताना बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा खनिकर्म अधिकारी अमर देवेकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनिता ओव्हळ, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, संयोजक संतोष पवार, ॲड. चेतन जाधव आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना म्हंटले कि, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्यासाठी भावाप्रमाणे धावून आले आहेत. उज्वला योजना, शौचालय, मातृवंदन योजना, आरोग्य योजना, किसान सन्मान योजना, रेशन योजना, नमो सन्मान, प्रधानमंत्री आवास योजना, शैक्षणिक योजना, अशा विविध योजनांबरबरच लाडकी बहीण योजना अंमलात आणून त्या यशस्वीपणे सुरु आहेत. या योजनेतून हातभार लागत आहे आणि या जोडीने आज वाटप होत असलेल्या यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून स्वयंरोजगाराची उपलब्धी झाली असून त्यामधून आर्थिदृष्ट्या सर्व बहिणी सबळ होणार आहात. लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प सरकारने केला आहे आणि त्याची अमंलबजावणी प्रगतीने सुरु आहे.

आज तुम्हाला मिळाल्या शिलाई मशीन घरघंटीचा वापर स्वयंरोजगार म्हणून चांगल्या प्रकारे करा. या उपक्रमाच्या माध्यमातून तुम्ही वापरलेल्या यंत्रसामुग्रीचे शासन पातळीवर सर्वेक्षण होणार आहे असे सांगून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून जो चांगल्या प्रकारे काम करतील स्वतःच्या कुटुंबाला हातभार लावतील आणि रोजगार मोठा करतील अशा दहा बहिणींना स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या नावाने पुरस्कार देणार असल्याची घोषणाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. आपल्या परिसरात विमानतळ आला आहे आणि त्या अनुषंगाने हजारो कामगार आतमध्ये तर तेवढेच कामगार बाहेरही काम करणार आहेत. त्यामुळे त्यांना अनेक गोष्टींची आवश्यकता लागणार आहे. येथील व्यवसाय दहा पटीने होणार आहे त्यामुळे आवश्यकता लक्षात घेऊन रोजगार वृद्धिंगत करता येणार आहे. सन २०२९ मध्ये लोकसभा निवडणुकीत तब्बल ३३ टक्के महिलांना आरक्षण मिळणार आहे त्यामुळे जवळपास १८१ महिला खासदार होणार आहेत, आणि अत्यंत चांगली बाब असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःची प्रतिष्ठा पणाला लावून सर्व बहिणीसाठी योजना आणल्या आहेत, त्यामुळे सर्व बहिणींनी आपला आशीर्वाद त्यांना द्यावा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी केले. त्याचबरोबर हि योजना यशस्वी करण्यासाठी काम करणाऱ्या अधिकारी व सहकाऱ्यांचे त्यांनी आभार मानत त्यांना धन्यवाद दिले.

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रात एकाच पत्त्यावर २६८ मतदार

### अरविंद म्हात्रे यांची चौकशीची मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रभागांतील मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस नावे समाविष्ट झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार होत आहेत. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासनियता धोक्यात येत असून, नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे ही बोगस नावे तातडीने तपासून मतदार यादीमधून वगळण्यात यावी. याबाबत पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी लक्ष टाकून ज्या ज्या प्रभागांमधून तक्रारी आलेल्या आहेत त्यांची शहानिशा करून ती नावे वगळण्यात यावी, जेणेकरून पनवेल महानगरपालिकेची निवडणूक ही पारदर्शकपणे पार पाडता येईल, असे मत पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरविंद म्हात्रे यांनी केले आहे.

त्यांनी सांगितले की, महानगरपालिका प्रभाग क्रमांक २ मध्ये जवळजवळ २००० मतदान बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याच्यामधून २६८ मतदार हे एकाच वडिलांच्या नावाने तेही एकाच घरात दर्शवले आहेत. महत्वाचे म्हणजे ते घर सुद्धा उपस्थित नाही.

तसेच, कल्याण पूर्व मधील मतदारांची प्रभाग क्रमांक २ मध्ये नोंद केलेली आहे. अशा प्रकारे बोगस मतदान प्रभाग क्रमांक २ मध्ये मोठ्या प्रमाणात केले आहेत. त्याची सविस्तर माहिती आयुक्तांना दिली असता त्यांनी सांगितले की, आम्ही मतदान कमी करू शकत नाही. त्यामुळे तुम्ही निवडणूक अधिकाऱ्यांकडे कळवा. त्याप्रमाणे मी स्वतः निवडणूक अधिकारी यांना ई-मेल केलेला आहे आणि सविस्तर पीडीएफ सुद्धा पाठवलेल्या आहे. जर निवडणूक अधिकारी यांनी मतदार यादीमध्ये बदल केला नाही तर मी स्वतः न्यायालयात या विषयावरती जाणार आहे.

## एकनाथ शिंदे यांच्या गटाचे ३५ आमदार फुटतील : खा.संजय राऊत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे ३५ आमदार फुटतील. ज्या पद्धतीने त्यांनी शिवसेने(ठाकरे) सोबत केले, अगदी त्याच पद्धतीने शिंदेंचे आमदार फोडण्याचे काम व्यवस्थितपणे सुरू आहे. रवींद्र चव्हाण हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांची नेमणूक त्यासाठीच करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहाच शिंदे सेना संपवणार असल्याचा दावा शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी केला.

गंभीर आजारपणामुळे महिनाभरापासून राजकारणापासून दूर असलेले शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांसमोर येत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहाच एकेदिवशी शिंदे गटाचा कोथळा बाहेर



काढतील असा दावा केला. त्यांनी आमचा कोथळा काढण्याचा प्रयत्न केला, पण आम्ही बाहेर पडलो. पण त्यांच्या स्वभावानुसार, कार्यपद्धतीनुसार शिंदे सेनेचा कोथळा हा दिल्लीतूनच काढला जाईल, असे ते म्हणाले.

एकनाथ शिंदे यांना वाटत असेल की दिल्लीचे २ नेते आमच्या पाठीशी आहेत, पण ते कुणाचेही नाहीत, ते कुणाच्याही पाठीशी नाहीत. त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसताना मागेपुढे पाहिले नाही, मग हे शिंदे कोण? शिंदे तर त्यांनीच पाळलेले आहेत. यावेळी शिंदेंची शिवसेना ही शिवसेना नसून तो अमित शहा यांनी तयार केलेला गट आहे. तो शहांचा पक्ष आहे, असे ते म्हणाले.

# शेवटी मरण कार्यकर्त्यांचेच!

महाराष्ट्रात गेल्या चार वर्षांपासून लोकप्रतिनिधींना बंद असलेले स्थानिक स्वराज्य संस्थांचे दरवाजे किलकिले होत आहेत. नगरपालिका व नगरपंचायतींच्या रूपाने स्थानिक निवडणुकांचा पहिला टप्पा मार्गी लागतो आहे. उद्या, मंगळवारी २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायती मिळून २८८ छोट्या शहरांमध्ये मतदान होत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या शुक्रवारच्या निर्णयाने महापालिका व जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला असला, तरी या सगळ्याच निवडणुकांचे निकाल पुढे जानेवारीत होणारी संबंधित याचिकांवरील सुनावणी आणि निकालांवर अवलंबून असतील. म्हणजे ही निवडणुका घेण्याची परवानगी सशर्त आहे आणि त्या शर्तीमुळे जवळपास नऊ-दहा वर्षांनंतर राजकीय भवितव्य आजमावणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांवर शेवटपर्यंत पोटनिवडणुकांची तलवार टांगती राहणार आहे. विशेषतः इतर मागासवर्गीय म्हणजे ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवणाऱ्यांसाठी सारे काही प्रचंड मनस्तापाचे असेल. त्याशिवाय अनेक नगरपरिषदा व नगरपालिकांमधील नगराध्यक्ष तसेच काही वॉर्डामधील चुकीचे आरक्षण व इतर बाबी न्यायालयात गेल्या. त्यावरील निकाल लागले नसल्याने त्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार आहे? खेड्यापाड्यातील ग्रामपंचायती, त्यानंतर पंचायत समिती व जिल्हा परिषदा ही ग्रामीण लोकप्रतिनिधित्वाची व्यवस्था, तसेच मोठ्या गावांमधील नगरपंचायती नगरपालिका, त्याहून मोठ्या शहरांमधील महापालिका ही शहरी प्रतिनिधित्वाची व्यवस्था हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्याराज्यांची विधानमंडळे आणि अंतिमतः लोकसभा व राज्यसभा मिळून संसद ही त्रिस्तरीय व्यवस्थाच लोकशाही बळकट करते. परंतु, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रामुख्याने ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेली चार वर्षे रखडल्या. कोणतेही लोकसंख्या सर्वेक्षण किंवा आकडेवारीशिवाय लागू असलेल्या ओबीसी आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२१ मध्ये चाप लावला. 'ट्रिपल टेस्ट'चा दंडक घालून दिला. त्या कारणाने ९२ नगरपरिषदांच्या निवडणुका जुलै २०२१ मध्ये थांबवण्यात आल्या. मुंबई, पुणे, नागपूर यासह २९ महानगरपालिकांमधील लोकनियुक्त प्रतिनिधींचा कार्यकाळ फेब्रुवारी-मार्च २०२२ मध्ये संपला. तेव्हापासून या महापालिका प्रशासकांच्या म्हणजे आयएएस अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत. यासोबतच ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांवरही प्रशासकांचे राज्य आहे. हे प्रशासक सामान्य नागरिकांचे ऐकत नाहीत. शिक्षण, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता या सेवांना त्यांचे प्राधान्य नसते. त्यांच्या कारभारात पारदर्शकता नाही आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचा त्यांच्यावर अंकुश नाही. परिणामी, अशा प्रशासकांच्या काळातील कथित भ्रष्टाचार हा सर्वत्र चर्चेचा विषय आहे. ही प्रशासकीय व्यवस्था राज्यातील सत्ताधाऱ्यांसाठी सोयीची असते. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये साधारणपणे सव्वा ते अडीच लाख लोक विविध ठिकाणी निवडून येतात. राजकारणासाठी इतक्या सगळ्यांना सांभाळणे किंवा विश्वासात घेण्याऐवजी साडेतीनशेच्या आसपास प्रशासकांना आदेश देणे, त्यांच्यामार्फत हवे ते कार्यक्रम राबविणे, सरकारचे धोरण अंमलात आणणे सोपे असते. झालेच तर आता नगरपालिका- नगरपंचायतींच्या प्रचारात जी 'मते द्या, निधी देतो' ही देवाणघेवाणीची भाषा सुरू आहे, तिचेही मूळ मोजक्या प्रशासकांच्या माध्यमातून कारभार चालवण्याच्या नेत्यांच्या सवयीमध्ये आहे. राज्याचे राजकारण करणाऱ्यांना या संस्था कार्यकर्त्यांसाठी सोडायच्या नाहीत. म्हणूनच आई, पत्नी, मुले-मुली, भाऊ-भावजय वगैरे कुटुंबातील माणसे निवडून आणून या संस्था ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तशीही आपली एकूणच राजकीय व्यवस्था एक विचार, एक पक्ष, एक नेता अशी एकाधिकारशाहीकडे प्रवास करत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधित्वाची व्यवस्था मोडकळीस येत असल्याबद्दल कुणाला खेद ना खंत. राजकारणातील दुसऱ्या फळीच्या कार्यकर्त्यांचे या प्रशासकीय राजवटींनी केलेले नुकसान खूप मोठे आहे. जवळपास १० वर्षांच्या खंडानंतर आता हे कार्यकर्ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. दरम्यान, बदललेल्या राजकारणाशी हे कार्यकर्ते कसे जुळवून घेतात आणि न्यायालयाच्या अंतिम निकालाची टांगती तलवार डोक्यावर असताना कसे काम करतात, हे पाहावे लागेल. एकंदरीत स्थिती अशी आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांची अशी लुळी-पांगळी व्यवस्था अजाणतेपणाने नव्हे तर जाणीवपूर्वक उभी केल्याचा संशय यावा.

# पोलादपूर पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीचा प्रारूप आराखडा झाला तयार

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** पोलादपूर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद आणि चार पंचायत समिती सदस्यांच्या जागांसाठी आगामी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ३९ हजार २४२ मतदारांना सहा सदस्य निवडून द्यायचे आहेत. तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाचा निवडणूक मतदार व मतदान केंद्रांचा प्रारूप आराखडा मंजूर झाला असून लवकरच निवडणुकीच्या कार्यक्रमासह आचारसंहितेची घोषणा होण्याची प्रतिक्षा पोलादपूरवासियांना उत्कंठेची झाली आहे.



पोलादपूर पंचायत समितीच्या नव्याने निर्माण झालेल्या ११५ माटवण गणामध्ये १८ मतदान केंद्र असून ४ हजार ९५६ पुरुष आणि ५ हजार १ महिला अशी एकूण ९ हजार ९५७ मतदार संख्या आहे. यासोबतच नव्याने निर्माण झालेल्या ११६ कापडे बुद्रुक गणामध्ये १८ मतदान केंद्र असून ५ हजार ३१६ पुरुष आणि ५ हजार १७४ महिला अशी एकूण १० हजार ४९० मतदार संख्या आहे. या दोन्ही पंचायत समिती गणांच्या मतदार संख्येच्या बेरजे एवढी नव्याने ५८ कापडे बुद्रुक जिल्हा परिषद गटाची मतदार संख्या २० हजार ४४७ झाली आहे. यामध्ये ३६ मतदान केंद्रातील १० हजार २७२ पुरुष आणि १० हजार १७५ महिला मतदारांची संख्या समाविष्ट आहे.

पोलादपूर तालुक्यातील ५९ लोहारे जिल्हा परिषद गटाची मतदार संख्या पुरुष ९ हजार २१३ आणि ९ हजार ५२८ अशी ३१ मतदान केंद्रामधून एकूण १८ हजार ७९५ एवढी आहे. नव्याने निर्माण झालेल्या ११८ कोतवाल बुद्रुक या पंचायत समिती गणातील एकूण १९ मतदान केंद्रांतील ५ हजार ६४ पुरुष आणि ५ हजार ४०५ महिला मतदार समावेश असलेली आहे. ही संख्या १० हजार ६६९ एवढी आहे. ११७ लोहारे पंचायत समिती गणामध्ये १२ मतदान केंद्र असून ४ हजार १४९ पुरुष आणि ४ हजार १७७ महिला मतदार एकूण ८ हजार ३२६ मतदार संख्या आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या लोहारे आणि कापडे बुद्रुक या २ गटांसह पोलादपूर पंचायत समितीच्या माटवण, कापडे बुद्रुक, लोहारे आणि कोतवाल बुद्रुक या ४ पंचायत समिती गणांच्या अशी एकूण ६ सदस्यांची निवड पोलादपूर तालुक्यातील ३९ हजार २४२ मतदारांना करायची आहे.

पोलादपूर तालुक्यात गेल्या महिन्यापासूनच पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या संभाव्य इच्छुक उमेदवारांनी सोशल मिडियावरून तसेच सोशल मीडियाच्या वृत्तपत्र प्रतिनिधींकडून प्रमाणात प्रसिध्दी मिळवत आपापल्या उमेदवारीची चर्चा घडवली आहे. मात्र, इच्छुकांना त्यांची उमेदवारी त्यांच्या पक्षाकडेच व्यक्त करता येणार असल्याने सोशल मिडियावरील गाजावाजाला फारसे महत्त्व नसल्याचे राजकीय पक्षांच्या प्रमुखांचे म्हणणे आहे. दरम्यान, पोलादपूर तालुक्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसेना उबाठा, भाजपा, शेकाप, जनता दल सेक्युलर तसेच बहुजन समाज पार्टीचे उमेदवार मागील काही निवडणुकांमध्ये लढताना दिसून आले होते.

# रेल्वेच्या मोटरमनला ५५ लाखांचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये राहणाऱ्या रेल्वेच्या मोटरमनला ५५ लाखांचा गंडा घातल्याची घटना घडली आहे.

सदर रेल्वेच्या मोटरमनला फेसबुकवर शेअर मार्केट संबंधीची जाहिरात दिसली. त्यांनी जाहिरातीतील लिंक उघडली असता त्यांना देशाबाहेरील नंबरवरून फोन येणे सुरू झाले. त्या व्यक्तींकडून ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक करून अधिकाधिक नफ्याचे आमिष सांगण्यात आले. त्याला भुलून मोटरमनने ५५ लाख ६७ हजार रुपये अज्ञाताच्या बँक खात्यावर पाठवले होते. मात्र त्यांना सतत तोटा झाल्याचे सांगून पैशांची मागणी होऊ लागली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

# कर्जत न.प. निवडणूकीच्या मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक अधिकारी व पोलीस सज्ज

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदान प्रक्रियेकरीता निवडणूक अधिकारी व कायदा सुव्यवस्था राखण्याकरीता पोलीस प्रशासन संपूर्ण तयारी झाली असुन, निवडणूक अधिकारी, कर्मचारीवर्ग व पोलीस प्रशासन हे उद्याचे मतदान प्रक्रियेसाठी सज्ज झाले आहे.

कर्जत नगर परिषदेच्या मतदान प्रक्रियेसाठी आज निवडणूक निर्णय अधिकारी तथा कर्जत तालुक्याचे तहसिलदार डॉ.धनजय जाधव यांच्या कडून ३३ बुथ वरील निवडणूक अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूकीसाठी लागणाऱ्या व्हीएम मशीनसह इतर साहीत्यांचे वाटप करण्यात आले आहे.

सर्व निवडणूक अधिकारी व कर्मचारी हे नेमणूकीनुसार आपआपल्या मतदान केंद्रावर पोहचले असुन, उद्याच्या मतदान प्रक्रियेकरीता सज्ज झाले आहे.

तर मतदान प्रक्रियेदरम्यान व शांतते मध्ये मतदान पार पडण्यासाठी व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड यांच्या देखरेखीखाली १२ पोलीस अधिकारी, १३५ पोलीस अंमलदार, १राईड कण्ट्रोल फोर्स प्लाटून, १ एसआर पी एफ प्लाटून, १ रिसर्व पोलीस प्लाटून व ५० होमगार्ड हे सज्ज झाले आहे.

# क्रिकेटवर मी जीवापाड प्रेम करतो : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** क्रिकेटवर मी जीवापाड प्रेम करतो. मी क्रिकेटचा एवढा चाहता आहे की, भारत-पाकिस्तान सामना कुठल्याही देशात असू दे, मी आवर्जून बघायला जातो. दर रविवारी पनवेलच्या एएससी महाविद्याल्याच्या मैदानावर सकाळी आठला हजर असतो, मनसोक्त क्रिकेट खेळतो. भिमाशंकरला वेळ मिळाला की ट्रेक करतो. जिंदादिल आयुष्य जगतो, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत मोहोपाडा येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते रायगड फोर्टीप्लस मास्टर्स बिग बॅश क्रिकेट स्पर्धेचे रविवारी (ता. ३०) बक्षीस वितरण करण्यात आले.



यावेळी पुढे ते म्हणाले, लिलाव प्रक्रियेला मी होतो. आता मोठमोठ्या रकमेच्या बक्षिसा आणि सुंदर नियोजन-आयोजन पाहून 'इवलेसे रोप लावियले दारी, त्याचा वेलू गेला गगनावरी' असे म्हणावेसे वाटते.

महेंद्रशेठ घरत खंबीरपणे आमच्या पाठीशी उभे आहेत. त्यामुळेच आम्ही भव्यदिव्य स्पर्धा आयोजित करू शकतोय. यंदाचे तिसरे पर्व आहे. त्यांनी ३२ संघांतील सुमारे ६०० खेळाडूंना स्पोर्टस ट्रॅक-टी-शर्ट दिले.

महेंद्रशेठ घरत यांच्यासारखे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आम्हा खेळाडूंना दीपस्तंभासारखे आहेत. ते आमच्यासाठी सर्वात मोठा आधार आहेत, असे फोर्टीप्लस रायगडचे अध्यक्ष अण्णा गावडे म्हणाले.

'एक धाव आरोग्यासाठी' या थीमवर या स्पर्धा मोहोपाडा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. दोन मोटरसायकल, पाच सायकल आणि रोख पाच लाख रुपयांची बक्षिसे या स्पर्धेत होती. फोर्टीप्लसचे सहा खेळाडू, फोर्टी फाईव्हप्लसचे चार आणि फिफ्टीप्लसचे तीन खेळाडू अशी संघरचना होती. रायगड जिल्ह्यातील असे ३२ संघ आणि ६०० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. उपाध्यक्ष वार. बी. पाटील, कार्याध्यक्ष मर्फीशेठ क्रियाडो, किरीट पाटील आणि पदाधिकाऱ्यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका निभावली. या स्पर्धा मोहोपाडा येथील एनआयएसएमच्या सुसज्ज मैदानावर झाल्या.

# जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि जिल्हाधिकारी व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीचे अध्यक्ष किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या नियोजनानुसार १ डिसेंबर जागतिक एड्स नियंत्रण दिनानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांच्या मार्फत १ ते १५ डिसेंबर दरम्यान विविध जागरूकता उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचा एक भाग म्हणून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी व पथकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श संजय माने यांनी एचआयव्ही/एड्सची कारणे, प्रतिबंधक उपाय, गैरसमज आणि एआरटी उपचार पद्धती याबाबत वैज्ञानिक माहिती दिली. लग्नापूर्वी ब्रह्मचर्य पाळणे, वैवाहिक नात्यात निष्ठा राखणे, तसेच संसर्गाचा धोका असल्यास लैंगिक संबंधांच्या वेळी निरोधाचा वापर करणे याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

तसेच आयसीटीसीच्या माध्यमातून जिल्ह्यातील २५० शाळा, २३० गावे आणि ४६ महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यशाळा घेण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. जागतिक एड्स पंधरवड्यानिमित्त ५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता बाईक रॅलीचे आयोजन करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांनी एचआयव्ही, हिपॅटायटिस बी, सी किंवा इतर कोणत्याही संसर्गजन्य आजाराने बाधित व्यक्तींशी भेदभाव न करता मानवतावादी दृष्टिकोनातून वागण्याचे आवाहन केले. त्यांनी Post Exposure Prophylaxis (PEP) तसेच Personal Protective Equipment (PPE) वापरण्याबाबतही मार्गदर्शन केले.

# पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' निमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये आज दिनांक ०१ डिसेंबर रोजी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा विभाग, कळंबोली प्रभाग, नावडे प्रभाग अशा विविध विभागातील एकुण पाच अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या बैठकिस परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे , उपायुक्त डॉ.वैभव विधाते,उपायुक्त सर्वश्री प्रसेनजित कारलेकर उप अभियंता विलास चव्हाण, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे.

नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

# महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वतयारीचा कोकण विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येत असतात. या अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांच्या पूर्वतयारीचा आढावा कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला.

कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त करावयाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे घेण्यात आली.

बैठकीस मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, कोकण विभाग अपर आयुक्त फरोग मुकादम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी.

चैत्यभूमी परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये या दृष्टीकोनातून पोलीस बंदोबस्त याबाबत काटेकोर नियोजन करण्यात यावे, असे निर्देश दिले.चैत्यभूमी परिसरातील स्वच्छता, साफ- सफाई याबाबत संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे जबाबदारी पार पाडावी असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत नियंत्रण कक्ष, आरोग्यसेवा, रुग्णवाहिका, रेल्वे व्यवस्था, बेस्ट आणि एसटी परिवहन व्यवस्था, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त तसेच वाहतूक नियोजन या संदर्भातही विभागीय आयुक्तांनी निर्देश दिले. बैठकीस कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# पनवेल शहरातून कारची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहा समोर उभी करून ठेवलेली काळ्या पिवळ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची कार अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

विद्या मनोहर यांची २,९५०००/- रुपये किमतीची गाडी क्रमांक एम एच ४६ बी एफ ४९२१ ही वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहा समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ४९ वर्षीय महिलेचा एआरडीएसवर यशस्वी उपचार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मेडिकव्हर हॉस्पिटलच्या टीमने ४९ वर्षीय दिलारा या महिलेवर झालेल्या अक्यूट रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (ARDS) या जीवघेण्या स्थितीवर यशस्वी उपचार केले. सुरुवातीला फ्लूसारखी लक्षणे असलेली रुग्ण काही दिवसांत गंभीर अवस्थेत पोहोचली आणि तिचे ऑक्सिजन सॅच्युरेशन फक्त ३०% होते. फुफ्फुस तज्ज्ञ डॉ. शाहिद पटेल आणि इंटेन्सिव्हिस्ट डॉ. अदिती जैन यांच्या नेतृत्वाखाली त्वरित व्हेंटिलेटर सपोर्ट, संसर्ग नियंत्रण आणि सतत मॉनिटरिंग करण्यात आले. श्वास घेण्यास मदत करण्यासाठी ट्रेकिओस्टोमी करण्यात आली आणि दोन आठवड्यांत रुग्णाला व्हेंटिलेटरवरून हटवण्यात यश आले. नंतर फिजिओथेरपी आणि रिहॅबिलिटेशनमुळे रुग्णाची उर्जा व चालण्याची क्षमता पुनर्संचयित झाली. तीन आठवड्यांत पूर्णपणे बरे होऊन दिलारांना डिस्चार्ज देण्यात आले.

दैनिक रायगड नगरी
बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम
संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद कब्जेदारांचे सातबारा पत्रकी नावे असलेली ताबे-कब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी कायम स्वरुपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| वाली ता.रोहा | विशाल विकास लाड व गणेश विकास लाड यांचे हिश्याचे क्षेत्र | १४ | ०-३१-०० पैकी ०-१५-५० | ०.१७ |

वरील वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तकार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तकार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

माणगांव
ता. १/१२/२०२५

सही/-
**ॲड.नितीन वि. आंब्रे**
**रा. श्री. जी. कॉम्प्लेक्स, ए विंग,**
**३ रा मजला कचेरी रोड माणगांव**
**९८५०८२१४१३**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे उसर्ली बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उसर्ली बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| लेखा राधारमण पाठक | ५७/२ | जिरायत ०-३०-२०<br>वरकस ०-३५-४०<br>पो.ख. ०-०९-३०<br>एकूण क्षेत्र ०-७४-९० | ५.३१ |
| | पैकी लिहून देणार यांच्या हिश्यातील क्षेत्र | ०-४४-०० | ३.५६ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०१/१२/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**आद्यकांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ,**
**ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे महाळुंगी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : महाळुंगी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) श्री.नितीन नागनाथ खानावकर<br>२) श्री.रविंद्र पांडुरंग पाटील | १०७ | ०-२४-००<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-२५-०० | ०.५९ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०१/१२/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**आद्यकांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ,**
**ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

# निलज येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**दै.रायगड नगरी । गौतम जाधव**

**वावेदिवाळी इंदापूर ।** लायन्स क्लब ऑफ माणगाव, लायन्स हेल्थ फाउंडेशन आणी ग्रामपंचायत निळज यांचे संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय निलज येथे मोफत, नेत्र चिकित्सा आणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले या शिबिरात रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

मोतीबिंदू रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली असून या कार्यक्रमासाठी, लायन्स क्लब ऑफ माणगाव चे अध्यक्ष लायन संदीपजी नागे, क्लब, मेम्बरशिप चेअर पर्सन लायन सुरेशजी मोहिते, डायरेक्टर ला संतोषजी नागे, विशाल जाधव साहेब, कृषी अधिकारी लायन्स हेल्थ फाउंडेशन चे निलेशजी म्हात्रे, तेरणा हॉस्पिटल चे राम महाडिक, आरोग्य सेवक सुधीर खैरे, श्रीम सी एन मोरे आरोग्य सेविका प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी ताई, आशा सेविका तसेच ग्रामपंचायत निळज विभागातील ग्रामस्थ आणी रुग्ण मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमांचे व्यवस्थापक -ग्रामपंचायत निळज च्या प्रशासक श्रीम सीमा काकडे मॅडम, तसेच ग्रामपंचायत अधिकारी श्रीम सारिका सायगावकर मॅडम ग्रामपंचायत कर्मचारी श्री अशोक सोंडकर या कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. २९२/२०२५

१ श्री. विकास उमाजी शेळके
२ श्री. मनोहर उमाजी शेळके
३ श्री. रतन उमाजी शेळके
४ श्री. विपीन उमाजी शेळके — अपिलार्थी

विरुध्द

१ श्री. गजानन विठू भोपी
रा. विंधणे, ता. उरण, जि. रायगड
२ रामा येसू पाटील मयत तर्फे वारस
२/१ श्री. काशिनाथ रामा पाटील
२/२ श्री. वसंत रामा पाटील
रा. विंधणे, ता. उरण, जि. रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे पोही (विंधणे), ता. उरण, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. ०८/१/ब क्षेत्र ०-५२-० हे. आर. आकार १.२५ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र. १९७/२०२३, दि. २३/०५/२०२५ मधील आदेशाविरुध्द अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. १२/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/१२/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलाच्या वतीने सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे सुचित करण्यात येते की, सिडकोने ट्रायपार्टाइट ॲग्रीमेन्ट/त्रिपक्षिय करारनामाचे दस्ताद्वारे श्री. बाबासाहेब महादेव भोसले, यांस खाली वर्णनीत भुखंड हस्तांतरीत केलेला आहे. सदरचा ट्रायपार्टाइट ॲग्रीमेन्टचा दस्त हा दिनांक २०/०९/२००८ रोजी साक्षांकीत झालेला असून तो मा. सह दुय्यम निबंधक उरण (पनवेल-२) यांचे कार्यालयात दिनांक २०/०९/२००८ रोजी अनुक्रमांक उरण-७०१६/२००८ कडे नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेअंतर्गत खालील वर्णनीत भुखंड क्षेत्राचे सर्व हक्क अधिकार व फायदा कायमस्वरुपी, ट्रायपार्टाईट ॲग्रीमेन्ट / त्रिपक्षीय भाडेपट्टा हक्क हस्तांतरण करारनाम्याद्वारे हस्तांतरीत / खरेदी करण्याचे माझे अशिल श्री. मनिष कुमार ठाकूर यांनी ठरविलेले आहे. याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्राची मागणी'' करण्यात आलेली आहे. त्या भूखंडाच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड/गाव | भूखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| मौजे उलवे, ता.पनवेल, जि.रायगड | १०४ | २ | ३९.९८ चौ.मी. |

उपरोक्त भूखंड/मिळकतींबाबत अन्य व्यक्ति/व्यक्तिंचे/कंपनी/संस्था/एलएलपी/सोसायटी / असोसिएशन किंवा आर्थिक संस्थांचे भुखंडासंदर्भात हक्क, दावा, कोणाचा कसलाही हक्क, जबाबदारी, वारस हितसंबंध, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, लोन, बुकिंग, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, भूखंड विकीचा करार, खरेदीखत, मेन्टेनन्स् मेहेर, हक्कसोड, विकी, विश्वस्त, कुळ, वहीवाट, दावा, तकार, ॲटेचमेंट, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर त्यासंबंधी लेखी निवेदन अथवा हरकत कागदोपत्री पुराव्यासह दयावी, याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशील सदर विकी व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व सदर भूखंडामध्ये कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हित संबंध नाही असे समजून माझे अशिल हे सिडको व वर नमूद भाडेपट्टाधारक यांचेसोबत ट्रायपार्टाइट ॲग्रीमेन्ट करुन सदर भूखंड हस्तांतरीत करून घेतील, त्यानंतर सदर मिळकतीचा संपूर्ण उपभोग घेण्याचा आमचे अशिलांना अधिकार राहील व तसे त्यांना सदर मिळकतीचे टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट ॲण्ड सर्च रिपोर्टही देण्यात येईल व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखलाही दिला जाईल. मुदतीनंतर आलेली हरकत ग्राहय धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

दि.०२/१२/२०२५

सही/-
**ॲड.प्राचाली श्रीरंग पाटील**
**सदनिका क. २०१, भद्रक्रतू को ऑप. हौ. सो.लि., ए.टी.आय. समोर, व्ही. एन. पुरव रोड, चुनाभट्टी, सायन, मुंबई -२२**
**मो. नं. ७२०८३३२३१८**

**अर्जदाराचे वकील : ॲड. रंजीत गजानन येरुणकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१६०२/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०१/२०२६

१) श्रीमती सुनिता जनार्दन मुंबईकर
वय ७३ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. वेश्वि, पो. दिघोडे, घर क्र. ५४९ए, ता. उरण, जि. रायगड
सध्या रा. गुलिस्तान अपार्टमेंट, फ्लॅट नंबर २०२, दूसरा मजला, मार्केट यार्ड, पनवेल उरण रोड, ता. पनवेल, जि. रायगड
२) श्री. अरुण वामन घरत
वय ६९ वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त
रा. आकांक्षा सोसायटी, पटेल पार्क, स्वामी नित्यानंद रोड, पोलीस स्टेशन जवळ, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
३) श्रीमती आशा जगन्नाथ पाटील
वय ६३ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. घर क्र. ४७, उलवे गाव, जिल्हा परिषद शाळे जवळ, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
सध्या रा. ब्लाक नंबर ६०३, सहावा मजला, बी विंग, सदाशिव बिल्डींग, गोदरेज प्लाझा समोर, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४) श्रीमती सुरेखा सदानंद गवंडी
वय ६१ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
मु. पो. पळस्पे, ८७५ पोलीस कॉलनी जवळ, ता. पनवेल, जि. रायगड
५) श्रीमती मनिषा मनोहर पाटील
वय ५९ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. पारीजात को. ऑप. हौ. सोसायटी, रूम नंबर सी/९, उरण नाक्याजवळ, ता. पनवेल, जि. रायगड
६) श्रीमती शैलजा कृष्णा उर्फ किसन कुडावकर
वय ५६ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. दापोली, पो. पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड
७) कु. हेमा वामन घरत
वय ५४ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. आकांक्षा सोसायटी, ए विंग, रूम नंबर २, स्वामी नित्यानंद रोड, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
८) श्रीमती सिमा रविंद्र पाटील
वय ५१ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. एफ २०४, निल रेसिडेनसी, प्लॉट नंबर ४८ ते ५१, रिद्धि सिद्धी बिल्डिंग जवळ, सेक्टर ३, नवीन पनवेल (पु), ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयत हिराबाई वामन घरत यांची अपत्ये असून मयत हिराबाई वामन घरत ह्या दिनांक १५/०१/२०१९ या दिवशी ००२, आकांक्षा को. ऑप. हौ. सोसायटी, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झालेल्या आहेत. मयत हिराबाई वामन घरत ह्या हयात असताना त्यांचे नावे असणाऱ्या सामाईक मालकीहक्कातील, ताबेकब्जा वहिवाटीतील जमीन मिळकती होत्या. त्या जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भूसंपादन युनिट केस क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५२२ | ४ | ०.०५.० | ०.१६ | वहाळ-५२९ |
| २ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४७५ | १ | ०.१५.० | ०.८१ | वहाळ-५२९ |
| ३ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४९१ | ६ | ०.०४.० | ०.११ | वहाळ-६१० |
| ४ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५२ | ३ | ०.०७.० | ०.७८ | वहाळ-८९ |
| ५ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५३ | १ | ०.०१.६ | ०.१७ | वहाळ-८९ |
| ६ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५३ | २ | ०.०२.७ | ०.२५ | वहाळ-८९ |
| ७ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५२१ | ३ | ०.०२.० | ०.०६ | वहाळ-८९/८५ |
| ८ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५४४ | ७ | ०.०१.० | ०.०३ | वहाळ-८९/८५ |
| ९ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५२२ | ५ | ०.०९.० | ०.२७ | वहाळ-८९/८५ |
| १० | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४७९ | ५ | ०.०७.० | ०.१६ | वहाळ-८९/८५ |
| ११ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४८० | ४ | ०.५०.० | १.५६ | वहाळ-८९/८५ |
| १२ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४८९ | ५ | ०.०९.० | १.४४ | वहाळ-८९/८५ |
| १३ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४९१ | ४ | ०.१०.० | ०.२५ | वहाळ-८९/८५ |
| १४ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | १४१ | १ | ०.१८.० | १.७६ | वहाळ-८९/८५ |
| १५ | मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ४९५ | ५ | ०.२३.० | २.४४ | वहाळ-८९/८५ |
| १६ | मौजे सोनखार, ता.पनवेल, जि.रायगड | १ | ११ | ०.१९.३ | १.३७ | सोनखार-११३ |
| १७ | मौजे सोनखार, ता.पनवेल, जि.रायगड | ३ | ११ | ०.०५.६ | ०.५८ | सोनखार-११३ |
| १८ | मौजे पाडेघर, ता.पनवेल, जि.रायगड | २९ क | १ पै | ०.०४.२ | | पाडेघर-२० |
| १९ | मौजे पाडेघर, ता.पनवेल, जि.रायगड | ४४बी | ३ | ०.००.५ | | पाडेघर-५ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून, ज्यांचा उल्लेख यात यापुढे सदरहु जमीन मिळकती असा केला आहे. मयत हिराबाई वामन घरत यांच्या मृत्यु पश्चात सदरहु जमीन मिळकती ह्या महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या असून परिच्छेद क्र. ४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे सदरहु जमीन मिळकतींचे निवाडे मयत वामन कुथाजी घरत व इतर यांचे नावे जाहीर झालेले आहेत. मयत वामन कुथाजी घरत यांच्या मृत्यु पश्चात परिच्छेद क्र. ४ मध्ये उल्लेख केलेल्या सदरहु जमीन मिळकतीच्या भुसंपादनाचे मोबदल्यात मिळणारी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम व सदरहु जमीन मिळकतीच्या अनुषंगाने १२.५ टक्के विकसीत भूवाटप योजनेनुसार शासनातर्फे सिडकोकडून मिळणारे विकसीत भुखंड तसेच भविष्यात मिळणारे इतर लाभासंबंधी मे. पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयातून चौकशी अर्ज क्र. ५९०/२००६ ने मयत वामन कुथाजी घरत यांचा वारस दाखला प्राप्त केलेला होता. सदरहु वारस दाखल्याप्रमाणे मयत हिराबाई वामन घरत ह्यांचे नावाची नोंद सदरहु जमीन मिळकतींचे अधिकार अभिलेखावर झाली. परंतु, आता मयत हिराबाई वामन घरत ह्या मयत झाल्याने सदरहु जमीन मिळकतीच्या भुसंपादनाचे मोबदल्यात मिळणारी वाढीव नुकसान भरपाईची रक्कम व सदरहु जमीन मिळकतीच्या अनुषंगाने १२.५ टक्के विकसीत भूवाटप योजनेनुसार शासनातर्फे सिडकोकडून मिळणारे विकसीत भुखंड तसेच भविष्यात मिळणारे इतर लाभ हे अर्जदार यांस मिळावेत याबाबत अर्जदार यांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता अर्जदार यांस मयत हिराबाई वामन घरत यांचे वारस असल्याबाबत दिवाणी न्यायालयाकडून वारस दाखला सादर करण्यास सांगितल्याने अर्जदारांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे मयत हिराबाई वामन घरत यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे. न्यायालय अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. १/१२/२५ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | (कोर्टाचा शिक्का) | सही/- **सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते मौजे पिसार्वे, तालुका-पनवेल, जि. रायगड, येथील रहिवासी कै. विठाबाई शंकर साळंखे उर्फ विठाबाई उंदऱ्या पाटील या मयत झाल्या असुन त्यांस कायदेशीर वारस १) नरेश शंकर सांळुखे २) मनोहर शंकर साळुंखे याव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, हितसंबंध, अधिकार वैगेरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. अथवा सदर मिळकतीस वरील कायदेशीर वारस असुन यांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही असे समजुन सर्वसंबंधितांनी आपाआपल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल व मुदतबाहय हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दि.२/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुदेश गव्हाणे**
**ऑफीस नं.४ व ५.१ला मजला तेजस्विनी आर्केड, युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या वर, के मॉल जवळ, स्टेशन तक्का रोड पनवेल, नवी मुंबई-४१०२०६.**
**फोन.नं. ९८३३३६३६२६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते मौजे पिसार्वे तालुका-पनवेल, जि.रायगड, येथील रहिवासी कै. बाळाराम लडकू पावशे हे मयत झाले असुन त्यांस कायदेशीर वारस १) श्रीमती अनुबाई बाळाराम पावशे २) श्रीमती सावित्रा बाळाराम पावशे ३) श्री. मंगेश बाळाराम पावशे ४) सौ. जयवंती अनिल म्हात्रे ५) श्री. विशाल बाळाराम पावशे ६) श्री. दत्ता बाळाराम पावशे असे असुन, याव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, हितसंबंध, अधिकार वैगेरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. अथवा सदर मिळकतीस वरील कायदेशीर वारस असुन यांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही असे समजुन सर्वसंबंधितांनी आपाआपल्या तथाकथित हरकती व तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल व मुदतबाहय हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दि.२/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुदेश गव्हाणे**
**ऑफीस नं.४ व ५.१ला मजला तेजस्विनी आर्केड, युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या वर, के मॉल जवळ, स्टेशन तक्का रोड पनवेल, नवी मुंबई-४१०२०६.**
**फोन.नं. ९८३३३६३६२६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते मौजे पिसार्वे तालुका-पनवेल, जि. रायगड, येथील रहिवासी कै. लडकू नथू पावशे व त्यांचे वारस पत्नी सखुबाई लडकू पावशे हे दोघे मयत झाले असुन त्या दोघांस कायदेशीर वारस १) कै. बाळाराम लडकू पावशे (मयत) वारस १.१) श्रीमती अनुबाई बाळाराम पावशे १.२) श्रीमती सावित्रा बाळाराम पावशे १.३) श्री. मंगेश बाळाराम पावशे १.४) सौ. जयवंती अनिल म्हात्रे १.५) श्री. विशाल बाळाराम पावशे १.६) श्री. दत्ता बाळाराम पावशे २) श्रीमती गुणाबाई गोपीनाथ पाटील ३) श्रीमती यशोदा ज्ञानेश्वर म्हात्रे उर्फ येसुबाई ज्ञानेश्वर म्हात्रे असे असुन, याव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, हितसंबंध, अधिकार वैगेरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. अथवा सदर मिळकतीस वरील कायदेशीर वारस असुन यांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही असे समजुन सर्वसंबंधितांनी आपाआपल्या तथाकथित हरकती व तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल व मुदतबाहय हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दि.२/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुदेश गव्हाणे**
**ऑफीस नं.४ व ५.१ला मजला तेजस्विनी आर्केड, युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या वर, के मॉल जवळ, स्टेशन तक्का रोड पनवेल, नवी मुंबई-४१०२०६.**
**फोन.नं. ९८३३३६३६२६**

# श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीत ६,२०२ पुरुष व ६,४३५ महिला मतदार हक्क बजावणार

## १२,६३७ मतदारांसाठी २० मतदान केंद्रे; प्रशासन, पोलीस यंत्रणा व निवडणूक कर्मचारी सज्ज

**दै.रायगड नगरी । विजय गिरी**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन नगरपरिषद निवडणूक २०२५ शांततेत, पारदर्शक आणि कायदेशीर चौकटीत पार पाडण्यासाठी संपूर्ण शासन यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदारांची आकडेवारी, मतदान केंद्रांची रचना, सुरक्षा बंदोबस्त, एतच् उपलब्धता आणि कर्मचारी नियोजन पूर्ण केले गेले आहे. यंदाच्या निवडणुकीत महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे पाहायला मिळत असून हा सहभाग उत्साहवर्धक मानला जातो.

मतदारांची आकडेवारी – महिला आघाडीवर : एकूण मतदार : १२,६३७, पुरुष मतदार : ६,२०२, महिला मतदार : ६,४३५ श्रीवर्धन शहरात महिलांची संख्या यंदा पुरुषांपेक्षा २३३ ने अधिक असून, महिला मतदारांचा वाढता सहभाग निवडणूक प्रक्रियेत विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रत्येक केंद्रावर पाणी, सावली, दिव्यांगांसाठी रॅम्प, बसण्याची व्यवस्था, स्वतंत्र प्रवेशमार्ग आदी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. सर्व केंद्रांची तपासणी पूर्ण झाली असून प्रशासनाने मतदारांना सहज, सुरक्षित व स्वच्छ मतदानाचे वातावरण तयार केले आहे. एतच्, मतमोजणी आणि तांत्रिक तयारी एतच् मशिन्स २०, मतमोजणी टेबलं १०, मतमोजणी फेऱ्या २, मतदान कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे २५० प्रशिक्षित प्रेझायडिंग ऑफिसर्स, मतदान अधिकारी, सहाय्यक व तांत्रिक कर्मचारी सर्व नेमून देण्यात आले असून, एतच् चाचणी, सीलिंग व मॉक पोल प्रक्रिया नियमानुसार पूर्ण झाल्या आहेत. मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था तयार असून सर्व प्रक्रिया उउढत देखरेखीखाली राहणार आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी मा. सौ. सविता गर्जे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण श्रीवर्धन शहरात सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. मतदान दिवसासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी व पथके सज्ज ठेवण्यात येणार आहेत. मतदान केंद्रांवर गस्त, शहरात वाहतूक नियंत्रण, सार्वजनिक सुव्यवस्था आणि कोणत्याही अप्रीय घटना टाळण्यासाठी पोलीस पथके सक्रिय राह-तील. शहरात धोकादायक किंवा अतिसंवेदनशील असे एकही केंद्र नसले तरी प्रतिबंधात्मक बंदोबस्त कायम ठेवणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रभाग रचना, साहित्य वितरण, वाहतूक नियोजन, मतदार यादी तपासणी, मतदान केंद्रांची अंतिम पाहणी या सर्व टप्प्यांची पूर्तता निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात आली आहे. प्रत्येक कारवाईवर अधिकृत देखरेख ठेवून पारदर्शक निवडणूक सुनिश्चित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. प्रशासनाने सर्व नागरिकांना संयम, शांतता व कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे.

# मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायातून ६ महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल ।** मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायातून ६ महिलांची गुन्हे शाखा पोलिसांनी सुटका केली आहे.



पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरपणाच सलुन आणि स्पा शॉप नंबर ०१, देवीज्योती हॉटेलचे जवळ, जुहूनगर, जुहूगाव, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई येथे ६०००/– रूपये घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत आहेत.

वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास आरपणाच सलुन आणि स्पा येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०६ महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. स्पाची महिला मॅनेजर असिमा रॉबिन घोष, वय ३४ वर्षे, रा. रूम नंबर ०३, साईकुंज सोसायटी, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई. मुळ रा. कोलकत्ता व तिचा पार्टनर पाहिजे आरोपी नर आलम शेख, रा. चेंबुर यांनी आपआपसात संगनमत करून ०६ महिलांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त केल्या. त्या महिलांना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून व्यवसायाचा मोबदला म्हणून ६०००/– रूपये स्विकारले.

महिला आरोपी व पाहिजे आरोपी यांचे विरूध्द वाशी पोलीस ठाणे येथे गु. रजि.नं. ६२७/२०२५, भा.न्या.सं. कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयातील अटक महिला आरोपीची दिनांक ०४/१२/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे. गुन्हयाचा तपास वाशी पोलीस ठाणे करत आहे. सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पृथ्वीराज घोरपडे, सपोनि योगेश देशमुख, पोउपनिरी सरिता गुडे, पोहवा मांडोळे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, पोशि चव्हाण, पोहवा अडकमोल, पोना अनिता भोये तसेच चालक पोहवा मोहिते यांनी केली आहे.

### रोहा–अष्टमी नगरपरिषद निवडणूक २०२५

# राष्ट्रवादीची प्रचारसभा राम मारुती चौकात उत्साहात, विकासाच्या मुद्यांवर निर्धार



**दै.रायगड नगरी । राकेश मोरे**

**रोहा ।** रोहा येथील ऐतिहासिक राम मारुती चौकात रोहा-अष्टमी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार कु.वनश्री शेडगे तसेच नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा मोठ्या उत्साहात पार पडली. कार्यकर्त्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या सभेत पक्ष विस्तारासाठी अनेक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

सभेला संबोधित करताना खासदार सुनील तटकरे यांनी रोहा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पक्षाची ठाम भूमिका मांडली. आतापर्यंत रोह्याच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले असून, हेच धोरण पुढील काळातही सुरू राहील, असे सांगत औद्योगिकीकरणामुळे शहरात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. शिव, शाहू, फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित विकासाचा मार्ग अवलंबून रोहेकरांसाठी ठोस नियोजन राबवले जात असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी अधोरेखित केले.

रोह्यातील पाणीपुरवठा योजनेचा उल्लेख करत शहरात वेगाने सुरू असलेल्या विकासकामांची माहिती देण्यात आली. तसेच, रणजी ट्रॉफीसारख्या दर्जाच्या सामन्यांचे आयोजन होईल असे आधुनिक स्टेडियम रोह्यात उभारण्यात येणार असून, त्यामुळे शहराची क्रीडा-ओळख अधिक मजबूत होणार असल्याचे सांगण्यात आले. तीन तारखेला घड्याळाचा आवाज अलिबाग आणि महाडपर्यंत पोहोचायला हवा, असे आवाहन करत मतदारांनी एकजुटीने विजयी कौल द्यावा, असे जोरदार आवाहन करण्यात आले. रोहेकर नेहमी केलेल्या कामाची पोचपावती देतात, यावेळीही देतील याची आम्हाला खात्री आहे. घड्याळाच्या बटणावर विश्वासाचा ठसा उमटवा आणि आपल्या उमेदवारांना विजयी करा, असे आव्हान करत खासदार सुनील तटकरे यांनी मतदारांशी भावनिक नाते अधोरेखित केले. मी कालही रोह्याचा नागरिक होतो, आजही आहे आणि उद्याही असेन; रोहेकरांची मान कधीही खाली झुकू देणार नाही, असा शब्द देत सभेला उत्साहवर्धक शेवट करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी आदिती तटकरे, अनिकेत तटकरे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, प्रमुख पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विकासाच्या अजेंड्यावर एकजूट दाखवत उमेदवारांना भरघोस पाठिंबा दर्शवला. या जाहीर सभेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रचार अधिक गती घेईल, तसेच रोहा-अष्टमी नगरपरिषद निवडणुकीत विकासाच्या मुद्यांवर रंगतदार लढत पाहायला मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### भक्तिमय वातावरणात कीर्तन आणि भजन; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती

# श्री दत्त जयंतीनिमित्त खिडूकपाडा येथे भाविकांसाठी नाटकाची मेजवानी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका हद्दीतील खिडूकपाडा येथे गेली २२ वर्षे अखंडपणे सुरु असणारा श्री दत्त जयंती महोत्सव हा सोहळा तालुक्यात प्रसिद्ध असा उत्सव सोहळा म्हणून ओळखला जातो. याही वर्षी श्री दत्त जयंतीचा हा सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवारी ४ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून आदल्या दिवसापासूनच भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाची सांगता दत्त जयंतीच्या रात्री भाविकांना नाटकाची मनोरंजक मेजवानी देऊन होणार आहे. यावेळी तालुक्यातील भाविकांनी या दत्त जयंती सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त भक्त तथा भाजपचे वाहतूक संघटनेचे अध्यक्ष, आम्ही श्रमिक कामगार संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास उर्फ आण्णा भोईर यांनी केले आहे.

यावेळी बोलताना प्रभुदास भोईर यांनी सांगितले की, दत्त जयंती सोहळा हा श्री क्षेत्र गाणगापूर येथे दत्त जयंतीच्या आदल्या दिवशी होत असल्यामुळे आपल्या येथे साजरा होणारा सोहळा देखील आदल्या दिवसापासून सुरु होत असतो.

यामध्ये कीर्तन आणि भजनाचे कार्यक्रम दोन दिवस सुरु असतात. तसेच श्री दत्त जयंतीच्या दिवशी सकाळी श्री दत्त मूर्तीचा अभिषेक करून दर्शनाला सुरुवात होणार आहे.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आमदार महेश बालदी यांच्यासह सर्वपक्षीय नेते याठिकाणी दर्शनाचा लाभ घेणार आहेत. तसेच सायंकाळी ६ वाजता होणारी महाआरती ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते पार पडणार आहे. यावेळी भाविकांनी श्री दत्तांचे दर्शन घेऊन, सायंकाळच्या महाआरतीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभुदास भोईर यांनी प्रसिद्धी माध्यमांद्वारे केले आहे.

### श्रीवर्धन नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५

# ना.अदिती तटकरे यांचा श्रीवर्धन मध्ये जोरदार प्रचार

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ जाहीर झाल्यानंतर सर्वच पक राजकीय पक्षांनी आपली मोर्चे बांधणी करायला सुरुवात केली होती. श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सुरुवातीपासूनच श्रीवर्धन नगरपरिषदेच्या निवडणुकीची जबाबदारी स्वीकारून प्रचाराचा धुमधडाका लावल्याचे पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांसोबत आदिती तटकरे या प्रत्येक व्यक्तीच्या घराघरापर्यंत जाऊन प्रचार करत होत्या.



घरातील वृद्ध व्यक्तींची विचारपूस देखील करताना त्या दिसून आल्या. थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र सातनाक यांच्या समवेत देखील त्यांनी मतदारांजवळ संपर्क साधला. कारण शिवसेना उबाठा गटाकडून थेट नगराध्यक्ष पदासाठी एडवोकेट अतुल चौगुले हे उमेदवार आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून रवींद्र पोशा चौलकर हे उमेदवार आहेत. तर शिवसेना शिंदे गटाकडून अक्षदा प्रीतम श्रीवर्धनकर या महिला उमेदवार आहेत.

थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शहरातील काही व्यक्तींनी समाजाचे राजकारण आणल्यामुळे अदिती तटकरे या कोणताही धोका पत्करण्यासाठी तयार नाहीत.

या निवडणुकीमध्ये बहुतांश प्रभागामधील निवडणूक ही शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यामध्येच लढली जाणार आहे.

शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार पिंट्या वेशवीकर व देवेंद्र भुसाणे आणि सलोनी मोहित यांचे पारडे या निवडणुकीत जड दिसत आहे. आज रात्री दहा वाजता प्रचाराच्या तोफा थंडावणार असून उद्या मतदान होणार आहे. श्रीवर्धन शहरात मतदानाची टक्केवारी वाढली तर या वेळेला राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय निश्चित होईल. असे बोलले जात आहे.

# उरण नगर परिषदेवर कमळ फुलणार : ना.रवींद्र चव्हाण

## काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते जे.डी.जोशी यांचा भाजपात पक्ष प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचा कमळ फुलणार असेच चित्र पुन्हा एकदा दिसत आहे. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे उरणच्या विकासाची जबाबदारी सांभाळण्यासाठी केंद्र व राज्य सरकार सक्षम आहे असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांनी उरण येथील सभेला संबोधित करताना केले.यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा उरण पंचायत समितीचे माजी उपसभापती जे.डी.जोशी यांनी रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला आहे.



उरण शहरात रविवारी ( दि३०) आयोजित करण्यात आलेल्या निर्धार सभेला संबोधित करताना उरणचे आमदार महेश बालदी यांनी सांगितले की विरोधकांना उरण शहराशी काहीही देणे घेणे नसून बाहेर राहून त्यांनी फक्त हप्ते वसुलीचे धंदे केले अशा पाकिटमारांच्या हाती उरणची जनता कधीही सत्ता देणार नाही.

यावेळी उरण नगर परिषद निवडणुकीत भाजपा घासून नाही तर ठासून विजयी होईल असा ठाम दावा ही व्यक्त केला आहे.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, भाजपाच्या महिला नेत्या सिमा ताई घरत, भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा कोळी – शहा, माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे उमेदवार रवि शेठ भोईर यांनी ही सभेला संबोधित करताना विरोधकांचा समाचार घेत भाजपाला विजयी करण्याचे आवाहन केले.

या सभेसाठी पनवेल चे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, रवी भोईर, भाजपा शहराध्यक्ष कौशिक शहा, निलेश पाटील, चंद्रकांत घरत, सुधीर घरत, जितेंद्र म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा कोळी –शहा व २१ नगरसेवक पदाचे उमेदवार यांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### के.ई.एस विद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

# पनवेकरांनी पहिला रामायण कथा ; कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रामायणमध्ये घडलेल्या इतिहासाला विध्यार्थीना रामायण या नाट्यतुन सादरीकरण केले. यावेळी पनवेलकरांना रामायण पाहण्याची संधी मिळाली.

पनवेल येथील कोकण एज्यकेशन सोसायटीच्या इंदुबाई वाजेकर इंग्लिश मिडीयम विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

शाळेच्या इंग्रजी माध्यमाच्या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यामध्ये पोवाडा, कीर्तन, जोगवा, नाटिका व नृत्य या कलाप्रकारांचा समावेश होता. प्रतिवर्षी कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी संस्कार सुमने ही संकल्पना साकारत शांती, संयम, विवेक व करुणा या गुणांचा अंगीकार करून त्यांच्यावर मात करावी व मनाला सुदृढ करून निकोप आयुष्य जगण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष गायन व वादन करत नृत्य सादर केले. कार्यक्रमाची संहिता विद्यार्थ्यांनीच लिहिली होती. शाळेतील विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त करणार्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी यांच्यासह चेअरमन व्ही. सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ आदींसह पालक मोठ्य़ा संख्येने उपस्थित होते.